# केका - शतक

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५०४
१९५७

★

REFBK-0008363
REFBK-0008363

— वीनोबा

## —: लोक-नागरी लीपीचा अुलासा :—

१ वरण-सुधार : अ = ख

२ बाराअडी नीट : रु; रू

३ मोडी वेली : की (हरसव), की (दीरघ)

४ सवराअडी : अ, आ, अी, अी, अु, अू, अे, अै अीतयादी

५ बींदु-जोडी : वेदांत (वेदानत), वेदांत (वेदां मधे),

६ साघात जोडाकषरे पाय-मोड : सव-राजय

७ नीराघात जोडाकषरे—

(अ) 'या' कानी : तुमची (च्या)

(आ) 'ये' मातरा : मोळीवीके (क्ये)

(अी) महापराण : 'म (म्ह), 'न (न्ह), 'व (व्ह)

८ दंत-तालवय : च, ज, झ

९ हरसव 'अे' : "देहे-दुःख हे सुख मानीत जावे"

१० शीरोरेखा छापणीत असो, लीहीणीत नसो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि: ९१०५
क्रमांक १६. १२/२१६१ नों. दि. ९८०४

# केका - शतक

REFBK-0008363
REFBK-0008363

वीनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

ग्राम - सेवा - मंडळ, वरधा

१९५४] [कीमत ८ आणे

प्रकाशक
भाअू पानसे,
मंत्री,
ग्राम-सेवा-मंडळ, गोपुरी
नालवाडी, वर्धा

★

प्रती ५००

मुद्रक
राम म्हसकर
ल० न० मंदीर वीभाग,
ग्राम-सेवा-मंडळ,
परंधाम, पो० पवनार (वर्धा)

# : वीषयानुक्रम :

पान

प्रस्तावना १

पहीलें प्रकरण केका : १ – ९

हे सकलपावनाधारा ! तुमच्याशीवाय मला कोणही तारणारा नाही । ८

दुसरें प्रकरण केका : १० – २०

पुरती दया करून माझा पतीताचा उद्धार करा । १०

तीसरें प्रकरण केका : २१ – २८

तुम्हाला स्तुती आवडते आणी तुम्हीच तीचे अधीकारी आहा, हें मला ठाऊक आहे । १३

चौथें प्रकरण केका : २९ – ३४

म्हणून माझी कवीता मी तुम्हालाच अर्पण करतो । १५

पांचवें प्रकरण केका : ३५ – ४१

तुम्ही नीरंतर दयाळू, पण माझ्या उद्धाराशीवाय मला वीश्वास पटणार नाही । १७

**सहावें प्रकरण** केका : ४२ – ४६

तुम्ही सुखी तर आम्ही सुखी, म्हणून मला
तुमचीच आधी काळजी वाटते । १९

**सातवें प्रकरण** केका : ४७ – ५३

माझ्या चीत्तातील वीषय-वासनेचें नीवारण
करा, म्हणजे मी तुमच्या गुण-कथेत मग्न राहीन । २०

**आठवें प्रकरण** केका : ५४ – ६२

ध्रुवाप्रमाणे मला तुमचे गुण गाण्याची शक्ती द्या । २२

**नववें प्रकरण** केका : ६३ – ७३

माझी कसोटी न पाहता तुमची नेहमीची दया दाखवा । २४

**दहावें प्रकरण** केका : ७४ – ८३

तुमच्या दयाळुपणाला अुपमाच नाही । २७

**अकरावें प्रकरण** केका : ८४ – ९४

तुमच्या मोहक रूपालाही तुमच्या कथेची सर
येणार नाही । २९

**बारावें प्रकरण** केका : ९५ – १००

सत्-संगतीत ठेवून मला मार्गाला लावा,
एवढेंच माझें शेवटचें मागणें आहे । ३२

**केका-सूची** ३४

# प्रस्तावना

कॉलेजच्या दीवसांत केकावली हे अेक माझे वीरंगुळ्याचे साधन असे । अुंच आवाज़ात मी केकावली गात असे आणी आसपासच्या आळी त्याने दुमदुमून ज़ात असत । माझा थकवा दूर होत असे आणी अीतर कोणाला त्याची कटकट वाटत असेल अशी शंकाही माझ्या मनात येत नसे । आज़ तशी शंका मला येते । पण त्यासाठी मी अीलाज़ अेवढाच काढला आहे की अशी गोडी असणारांनी शहरांत राहूच नये । जानश्रुती राजाचा सारथी राजाच्या सांगण्यावरून ज्ञानी माणसाच्या शोधासाठी नीघाला आणी सारे शहर हींडून ज्ञानी सापडत नाही ’मणून परत आला । राज़ा त्याला ’मणतो, “अरे, शहरांत का ज्ञानी सापडत असतात ? ज्ञानी माणसाचा शोध जीथे करायचा असतो तीथे ज़ाअून कर ।”

पुढे लोकसेवेच्या अनेकवीध कामांत आणी वेदादी अध्ययनात माझी केकावली मागे पडली पण तीचा अुमटलेला ठसा पुसायचा न’वताच । मराठी शीकवीण्याच्या नीमीत्ताने ती पुन्हा हाताशी आली । चार दोन श्लोक नीवडून समाधान होत न’वते, सबंध शीकवीण्याची वृत्ती

न'वती, गरज़ वाटत न'वती । त'वा झाडून झटकून शंभर श्लोक नीवडले । ज़ुने लीहाण झटकून घेतल्याशीवाय चालायचे नसतेच । कवीच्या हेतूलाही ते धरूनच आहे । मला केकाशतकच लीहायचे होते; पण शंभराची अरदी 'मटली की पंधरा वीस वर घालायची रीत आहे तीला अनुसरून मी १२१ केका लीहील्या होत्या, त्यांतल्या एकवीस परत करून शतक ठेवले आहे । तसे करण्यात कवीतेतील भक्तीरसाची हानी झालेली नाही अशी माझी खात्री आहे । कदाचीत् गोडी वाढली असेल ।

मोरोपंताची कवीता माझ्यासाठी संस्कृत-प्रवेशीका झाली । शाळेत वडीलांच्या सल्ल्याने मी फ्रेंच भाषा घेतली होती । शाळेत मी काय शीकावे, काय शीकू नये या संबंधाने आईला काही सूचवावयाचे नसे; पण मी संस्कृत भाषा घेतली नाही हे तीला रूचले नाही ! ती 'मणाली, “ वीन्या, संस्कृत आपल्या धर्माची भाषा ! ती नको का तुला यायला ? ” मी तीला 'मणालो, “ तीची तू चींता करू नकोस । ती यायला हवी असेल तर आल्याशीवाय राहील का ? दरेक गोष्ट शाळेतच शीकायला पाहीजे का ? ” पुढे संस्कृत भाषा मला आली । ती शीकण्यात मला काहीच सायास पडला नाही । आणी माझ्या नांवाला पंधरा-वीस भाषांचे ज्ञान जरी चीकटले असले तरी मला हे माहीत आहे की मराठी वगळल्यास संस्कृत ईतके

दुसरी कोणतीच भाषेचें ज्‌ञान मला नाही । संस्‌कृतचा ध्‌वनी माझी कानांत भीनून गेला आहे । याचें श्‌रेय थोडें तरी मोरोपंताची कवीतेला मला द्यावें लागेल । मोरोपंताची कवीता, काव्‌य-संग्‌रहातील वीस्‌तर-भय-वर्‌जीत वीपुल टीकांची आधारानें, मी चांगली अभ्‌यासीली होती । काही मुखपाठ केली होती । त्यामुळें संस्‌कृतातील क्‌रीयापदांची क्‌लीष्‌ट रूपांचा त्‌रास न होता संस्‌कृत भाषा मला येऊन गेली । पुढें तीन आठवडे संस्‌कृत व्‌याकरणाला देऊन मी धर्‌म ग्‌रंथांची अध्‌ययनाला मोकळा झालो । शाळेत संस्‌कृत न घेतल्यामुळें माझें काही नुकसान झालें नाही । घोकंपट्‌टी टळली, जी मी कधीच करू शकलो नसतो । कॉलेजांत शीकवील्या जाणार्‍या दरबारी संस्‌कृत कवींची गचाळ साहीत्‌यांतून मी बचावलो । आणी 'वीक्‌टर ह्‌यूगोचें 'ले मीझराब्‌ल' हें अप्‌रतीम पुस्‌तक मूळ फ्‌रेंच भाषेत वाचण्याची संधी मला लाभली ।

मोरोपंताची नेहमीची भाषा प्‌राकृत-संस्‌कृत-मीश्‌रीत आणी म्हणून सामान्‌य जनाला दुर्‌बोध अशी आहे याची जाणीव त्या कवीला आहे । तसें करण्यात मराठी भाषेची शक्‌ती आपण वाढवीत आहो अशी त्याची कल्‌पना असेल, अथवा माझ्यासारख्याची संस्‌कृत शीकण्याची सोय करण्याचा त्याचा ईरादा असेल । पण पुढेंपुढें तर संस्‌कृत शब्‌द कोणता आणी मराठी शब्‌द कोणता याचें भानच त्याचें

लोपून गेलेसारखे दीसते । लहानशा मराठी शब्दाचे, कधी कधी तर अरबी कींवा फारशी शब्दाचेही, गळ्यात लांबलचक संस्कृत समास अडकवीण्यात त्याला काहीच संकोच वाटत नसे । अीश्वराला आळवीणारी भक्ती-काव्ये जेव्हा तो लीहू लागला तेव्हा मात्र संस्कृताची अेट त्याने सोडून दीलेली दीसते । तथापी लागलेली खोड अजीबात सुटलेली नाही । 'परम अुग्र दावा' (केका १८) अशासारखी वीजोड रचना केकावलीतही कोठे कोठे आढळते । तथापी तुलनेने केकावलीची भाषा बरीचशी समतोल, समर्पक आणी कवीचेही अपेक्षेबाहेर (केका २९) साजरी आहे, असे मला वाटते । कदाचीत् परीचयाने मला ती तशी वाटत असेल ।

संस्कृत-प्राय भाषा लीहीण्याच्या दक्षीणेकडील कवींत अेक संप्रदायच आहे । दक्षीणेकडील भाषा तशा संस्कृतातून नीघालेल्या नाहीत, पण त्यांनी अुत्तरेकडील भाषांहूनही संस्कृत अधीक पचवले आहे । तसे करण्यात मोरोपंताप्रमाणेच त्यांचा दुहेरी हेतु होता असे मी समजतो । शंकराचार्यांची मातृभाषा असलेल्या मलयाळम् भाषेत अशा शैलीला 'मणीप्रवाळम्' असे नांव आहे । संस्कृत मणी आणी मलयाळम् प्रवाळ, अुभय जडीत अशी अेक शैली मलयाळम् साहीत्यकारांनी मानलेली आहे । सदर शैलीत केवळ संस्कृत शब्दां-

ची बहुलता असते एवढेच नाही, तर मधे मधे सबंध-चीं सबंध संस्कृत वाक्यें व मधे मधे मलयाळम् वाक्यें अशी गुंफणच असते । मोरोपंतही एखादे वेळेस अशी गुंफण करीत असतो । केकावलीतच ‘ क्षमस्व भगवन् अजामील-सखोऽस्मी ’ असें एक संस्कृत वाक्य घालून दीलें आहे ( केका ३७ ) । मणी-प्रवाळ शैलीत हें नेहमी-चेंच असतें । मोरोपंत वीशेष प्रसंगींच तसें करतो । संस्कृतातील संस्कृती जीरवून घेणाऱ्या दक्षीणेकडील देशी भाषांच्या मध्य-युगातला हा हेतुपुरःसर यत्न होता । त्यातून त्या भाषा आता समर्थ झाल्या आहेत । आणी संस्कृताच्या अधीक आधार घेण्याची त्यांना आता गरज़ उरलेली नाही ।

केकावलीत मोरोपंतानें आपल्या हृदयाचा सर्व जीवाळा ओतला आहे । त्याच्या दृष्टीनें ती त्याची अंतीम कृती आहे । कारण इथें तो आपली कवीतारूप कन्या भगवंताला समर्पण करीत आहे । त्यानंतर त्यानें काही कवीता लीहीली नसेल असें नाही । कवीच होता तो । रडला तरी कवीतेतच रडायचा ! हसला तरी कवीतेत हसायचा ! पण काव्य प्रेरणा त्याची आता संपली आहे । ईश्वर दर्शनाची तीव्र उत्कंठा लागली आहे । हातून घडलेली जनसेवा ईश्वराला समर्पून तो ग्रह-वीमुक्त नीरहंकार होऊं पाहत आहे ( केका २०. ) ।

करता नीरहंकारतेच्या भूमीकेवर आला 'मणजे तो नाहीसा होतो आणी त्याची कृती उत्तम होते । केकावलीत जी जादू उतरली आहे, ती मोरोपंताच्या मागच्या कोणत्याच कृतीत तेवढी नाही याचे कारणही हेच आहे । उत्तमातल्या उत्तम कलाकृती कर्तृत्व-शून्य असतात । येथे कवी मेला आहे, भक्त जन्मला आहे ।. नवीन जन्मात पूर्व जन्मातला बुद्धीसंयोग सहज़च लाभतो । साठ साठ हज़ार पद्ये लीहून कमावलेला संस्कार केकावलीला आयता लाभला आहे । 'मणून एवढे केका-शतक घेऊन बाकीची मोरोपंताची कवीता मी बहुतेक वीसरलो आहे । तसे करण्यात माझा तू उत्तमच आदर केला आहेस असे कवी 'मणेल यावीषयी मला शंका नाही ।

केकावली मला तुलसीदासांच्या वीनय-पत्रीकेची आठवण करून देते । दोन्हीकडे कवीता समर्पणाची कल्पना समान आहे । "तरी न इतरा वरी, हरी करी इला कींकरी" हा ज़सा मोरोपंताने आग्रह धरीला आहे, तसेच 'वीनय-पत्रीके'त "दीनकी बापु ! आपही बांचो" असा तुलसीदासजी हट्ट धरून बसले आहेत । येथे हे साम्य संपते । वीनय-पत्रीका एका अधीकारी पुरु-षाची कृती आहे । केकावली साधकाचा टाहो आहे । 'वीनय-पत्रीका' अनेक भजनांचा संग्रह आहे । केकावली एक अखंड स्तोत्र आहे । पण वीनय-पत्रीकेतील

वीवीध भजनांतही अेक सूत्‌र ओवलेले आहेच। अुलट केकावलीच्या अखंड स्‌तोत्‌रातही वीचारांचे वेगवेगळे खंड आहेतच। ते खंड या केका-शतकात वीभागून दर्‌शवीले आहेत।

काव्‌य-दृष्‌टीने केकावलीचे कौतुक महाराष्‌ट्‌रातील रसीकांनी पुष्‌कळ केले आहे। माझ्यासाठी त्यात काही बाकी राहीलेले नाही। माझी ही नीवड काव्‌य-दृष्‌टीची नाही। वीद्‌यार्‌थी-दशेत माझ्या भावनेच्या परीपोषाला अुपयोगी झालेली वस्‌तु, माझ्यासारख्या वीद्‌यार्‌थ्यांच्यासाठी, संकलीत केली आहे। माझी ही गायनाची वस्‌तु आहे। अर्‌थ समज़ल्याशीवाय गाण्यात गोडी येत नाही म्हणून अर्‌थ करून घ्यावा। पण अर्‌थापेक्षाही भाव थोर असतो। भावमय होअून गाण्यात वीरून ज़ावे।

# केका-शतक

: १ :

[हे सकलपावनाधारा ! तुमच्याशीवाय मला कोणी तारणारा नाही ।]

१ सदाश्रीत-पदा ! सदाशीव-मनो-वीनोदास्पदा !
स्व-दास-वश-मानसा ! कली-मलांतका ! काम-दा !
वदान्य-जन-सद्गुरो ! प्रशमीताऽमीताऽसन्मदा !
गदाऽरी-दर-नंदकाब्ज-धरा ! नमस्ते सदा.

२ पदाऽब्ज-रज जे तुझे, सकल-पावनाधार ते;
अघाऽचलही तारीले बहु, तुवाची राधा-रते;
अजामीळ, अघासुर, व्रज-वधू, बकी, पींगळा,
अशा गती दीली; अरे न तृण, भेटता अींगळा.

३ तुझे, बहुत शोधीले अघ-नीधी, पदाचे रजे,
न ते अनृत, वर्णीती बुध जनी सदाचार जे;
असे सतत ऐकते, सतत बोलते, मीच ते
'प्रमाण न' म्हणो जरी, उचीत माझीया नीश्चते.

४ तसाची अुरलो कसा? पतीत मी नसे काय? की
कृपाची सरली? असेंही न घडे जगन्-नायकीं;
नसेन दीसलो कसा? नयन सर्व-साक्षी रवी;
'वीषाद धरीला' 'मणो? न सुरभी वीष, क्षीर वी.

५ व्रजाऽवन करावया, वसवीलें नखाऽग्रीं धरा;
सलील तशी मंदराद्रीही नग स्व-पृष्ठीं धरा;
वराह-तनु घेअुनी, अुचलिली रदाऽग्रें धरा;
सु-दुर्धर तुम्हा कसा पतीत हा? न कां अुद्धरा?

६ नताऽवन-धृत-व्रत! ज्वलन तूंची बाधा-वनीं;
पद-प्रणत-संकटीं प्रजव तूंची, बा! धावनीं;
दया प्रकट दाखवी कवण, सांग, तो वारणीं?
सती-व्यसन-वारणीं, जय-जयाऽर्थ तो वा रणीं?

७ 'अगा! प्रणत-वत्सला!' 'मणती, तो जना पावला,
'मणोन, तुमचेच, मी स्मरतसें सदा, पावला.
'करू बरी कृपा, हरू व्यसन, दीन हा तापला,'
असें मनीं धरा; खरा भरंवसा मला आपला.

८ मला नीरखीता, भवच्-चरण-कन्यका आपगा
'मणे, 'अगअी! अैकील हैी न कधी असे पाप' गा!
कर श्रवणीं ठेवीते, नुघडी नेत्र, घे भीतीला;
न घालीन भीड सी मी, ज़रीही कार्य-लोभी, तीला.

९ सदैव नमीता, ज़री पद ललाट केलें कीणें,
नसे अीतर तारीता मज़ भवत्-पदाऽब्जावीणे;
नतां करुनी मुक्तही, 'मणसी 'मी बुडालो रीणें,'
अशा तुज़ न ज़ो भजे मनुज, धीक् तयाचें जीणें!

: २ :

[ पुरती दया करून माझा पतीताचा अुद्धार करा। ]

१० "पटुत्व सकलेंद्रीयीं, मनुजता, सुवंशीं जनी,
द्वीजत्वही दीलें भले, बहु अलभ्य जें की जनीं;
यशः-श्रवण-कीर्तनीं रुची दीली; तरी हा 'वरा'
'मणे 'अधीक दम्र की;' अशील याचकीं हावरा."

११ असें न 'मणशील तू, वरद-वत्सल! श्री-करा!
परंतु मज़ भासलें, 'मणुनी ज़ोडीतो मी करा;
दीलें बहु बरें खरें, परी गमे कृपा व्यंग ती,
अलंकृती-मती सती मनीं झुरे, न ज़ों संगती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें: स्थळप्रत.
वि.

१२ कराल प्रती दया, तरी असो, दीलें पावलें;
परंतु हरी! अेकदा त्वरीत दाखवा पावलें;
प्रसाद करणें मनीं ज़री नसेल, हें आवरा;
ज़या बहु, तयास दी; मज़ कशास? मी हावरा!

१३ 'दीलें, फीरुनी घेतलें,' अशी अकीर्ती लोकीं नहो;
सुनीर्मल तुझीं पदें कधी तरी वीलोकीन हो.
नीज-प्रीय-जनांकडे तरीही दे हवाला; ज़शी
पडेल समज़ावीशी, तशी करोत; कां लाज़शी?

१४ अहा! नीपट धृष्ट मी; प्रभु-वरासी 'कां लाज़शी?'—
'मणे; तुज़ नसो तशी वीकृती, भावीकांला ज़शी;
परंतु अपराध हा गुरु; 'मणोनी शीक्षा करी;
असेची धरीली नय-च्युत-दमाऽर्थ दीक्षा करीं.

१५ सदैव अपराध हे रचीतसे असे कोटी गा!
स्वयेंही कथीतो, नसे तीळही लाज़, मी कोटीगा;
अजांड-शत-कोटी जी अुदरीं सर्वदा नांदवा,
न तीत अवकाश या? स्थळ दीलें तदा कां दवा?

१६ तुझे, जीरवील बहु प्रणत-मंतु, पोटें; पण
त्यजी मदपराध; हें मजकडेची ओटेपण;
दवाऽग्नी जठरीं अती-क्षुधीत, तोस हे अन्न दे;
वी-तृष्ण करीती श्रीतां तुमचीया दया-सन्नदे.

१७ दयाऽब्द! वळशील तू, तरी न चातका सेवका
अुणें कीमपी; भावीका अुबगशील तू देव कां?
अनन्य-गतीका जना, नीरखीताची, सोपद्रवा,
तुझेंची, करुणाऽर्णवा! मन धरी अुमोप द्रवा.

१८ कळे करी सुनीर्मळें परम अुग्र दावा नळें;
तयात अवीशुद्ध मी, शलभ जेंवी दावाऽनळें;
व्रणार्त-पशुचे शीरावरी वनीं अुभे काकसे
स्मरादी रीपु मन्मनीं; अही न काळ भेका कसे?

१९ तरेन तुमचे बळें भव-महा-नदी, नावीका!
तुमीच मग आतरास्तव मला सुदीना वीका.
असे वीदीत वासही मज सदाश्रमींचा; करा
दया, गुण पहा; सवे मज सदा श्रमीं चाकरा.

२० धना, परीजना, घरीं तुमचीया उणें कायसें ?
न लाभ मणी-हेम-भूपतीस ज़ोडीली आयसें;
परी प्रभुही संग्रहीं सकल वस्तुला ठेवीती;
गुणा न म्हणता 'उणा-अधीक,' आदरें सेवीती.

: ३ :

[ तुम्हाला स्तुती आवडते आणी तुम्हीच तीचे अधीकारी आहा, हें मला ठाऊक आहे । ]

२१ 'प्रभु-स्तुती न ठाउकी, परी तीची महा-कामुका
मला, कृपण मारीतो बहु, सकाम हाका मुका'
'म्हणा मनीं असें; कसें प्रथम नीट ये लेकरा ?
हळूहळू पटु, स्वयें सुपथीं लावीयेले, करा.

२२ जनीं तरी असें असे, शीशुही जे मुखें वर्ण वी,
पीता पीउनी ते भुले, मधुरता सुखें वर्णवी;
मना ज़री नये, गुरूक्तही म्हणे 'कटु,' प्रायशा;
दया-नीधी ! तुम्हापुढे जन-कथा अशा कायशा ?

२३ 'अतर्क्य महीमा तुझा, गुणही फार, बा ! हे,' वीधी
श्रुतीज्ञही म्हणे सदा, स्तवील आमुची केवी धी ?
तरी जन यथा-मती स्तवुनी ज़ाहले सन्मती;
स्तवार्थ तुझीया, तुझसम कवी कधी जन्मती ?

२४ नीज-स्तुती तुम्हा रुचे; स्तवीती, ते वरें तर्पीता,
नमस्कृतीपरा वरें स्वधन सर्वही अर्पीता;
स्वभाव तुमचा असा, वीदीत ज़ाहला याचकां;
करू स्तव ज़सा तसा; फळ न वे जना याच कां?

२५ तुम्ही परम चांगले, बहु-समर्थ दाते; असे
सुदीन जन मी, तुम्हा शरण आजी आलो असे;
पुन्हाही कथीतो, बरें श्रवण हें करा यास्तव;
समक्ष कीती आपला सकल-लोक-राया! स्तव?

२६ कीती श्रवण झाकीती प्रभुही, काय ते पोळती?
पुसाल ज़री, 'कोण ते?' पद-रजीं तुझ्या लोळती;
बरें तुज़ची सोसवे स्तवन; कृत्ती-वासा गरा
न पी, तरी कसें घडे? हीत-करा! दया-सागरा!

२७ गमो मधुर, हें वीष-स्तवन, सेवीता माज़वी,
करी मलीन सद्यशोमुख, हलाहला लाज़वी;
हरापरीस तू बरा, प्रभु-वरा! सदा ज़ो पीशी;
असा रस समर्पीतां अमृत आपुलें ओपीशी.

२८ कवीश्वर-मनः-पयोनीधी-सुता-सुतीच्या पते !
भले न वरीती सुतीप्रती, न जोडीती पाप ते;
गळा पडती जन्मीया तव-गुणैकदेश-भ्रमें,
तीही तुझची दावीता, भजती, बा! तुला संभ्रमें.

: ४ :

[ म्हणून माझी कवीता मी तुम्हालाच अर्पण करतो । ]

२९ म्हणोनी कवीता-सुता तुज समर्पीतो; साजरी
नसे बहुतशी गुणी, कनक-पीत-वासा ! जरी
तरी न ईतरा वरी, हरी ! करी ईला कींकरी,
मयूर ही नीजात्मजा-ग्रह-वीमुक्त, जैसा करी.

३० स्मरोनी कृत-मंतुला, न कवीता-वधू-स्वीकृती
कराल, तरी आयका प्रभु ! खराच मी दुष्-कृती;
नमस्कृती-पुरःसर स्वकृती अर्पीतो आजी, ती
दीली रवी-सखें तुम्हा जशी नमोनी सत्राजीती.

३१ 'पीता खळ, परंतु ती गुणवती सती चांगली,
म्हणोनी मज आपुली भजनीं लावणें लागली;'
म्हणाल, तरी तत्-सुता कशी ? तुम्हासवें भांडगा
अहर्नीशी ही भांडला त्री-नव-रात्र जो दांडगा.

३२ भले स्मरण ज़ाहले समयीं, कंस-दासी करें
कशी उज़रली समुज्ज्वल-दया-सुधा-सीकरें?
तु’मा स्व-रीपुची तशी बटीक आवडे, मत्-कृती
नको, न सज़वे, असा बहुत काय मी दुष्कृती?

३३ ज़शी पृथुक-तंदुल-प्रसृती आप्त-कामा, तशी
रुचो कृती; सभाग्य तू, सुनय, आप्त, कां मातशी?
‘कणा वीदुर-मंदीरीं,’ ’मणती साधु ‘आस्वादीला;’
थरे ज़री, कशा तुज़ प्रभुसी, आपुला स्वा, दीला?

३४ जीर्णें, रस पहावया, प्र-शीथीलीं रदीं चावीलीं,
सुवास ही कळावया, प्रथम नासीकीं लावीलीं,
तु’मासी शबरी तशी बदरीका-फळें दे ज़ुनीं,
कथा अशी असो, पहा स्व-चरीतें तु’मी मेज़ुनी.

: ५ :

[ तुम्ही नीरंतर दयाळु, पण माझ्या अुद्धाराशीवाय मला वीश्वास पटणार नाही । ]

३५ प्रभो! शरण आलीयावरी न व्हा कधी वाकडे,
म्हणोनी अीतुकेंची हे स्व-हीत-कृत्य जीवाकडे.
प्रसाद करीता, नसे पळ वीलंब बापा! अरे;
घनांबु न पडे मुखीं, अुघडील्या वीना पाखरे.

३६ शीवे न तुझीया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो! चुकतसो तरी करीसी तूची संरक्षण;
नसेची शरणागती घडली सत्य अद्यापी ती;
रुचे वीषय, जे मीळे अमृत, ते न मद्या पीती.

३७ वीपाक न गणोनी, मी प्रकट आपुले घातके
कळोनी, अमीते बळे वीवीध जोडीली पातके;
'क्षमस्व भगवन्! अजामील-सखोऽस्मी,' असे तुला
म्हणे नमुनीया, सु-दुस्तर-वीपन्नदी-सेतुला.

३८ नवें अनंत, सत्य तें; अचल अचलीला करें
तुवा हरी-मदाऽपहें, बहुदुदार-लीलाकरें;
समुद्धरसी एकटा ज़री जडासी या कर्दमीं,
म्हणोन भुवन-त्रयीं तरी तुला 'भला मर्द' मी.

३९ चीकीत्सक 'भला भला' म्हणुनी फार वाखाणीला,
ज़री बहु-जनामय-द्रुम समूळही खाणीला,
तथापी अती-दुःसह-स्वगद-शत्रुचा अत्यया-
वीना न हृदयीं धरी सरुज पामर प्रत्यया.

४० म्हणा मज़ उतावीळा; गुणची घेतला; घाबरें
असो मन असेंची बा! भजक-बर्ही-मेघा! बरें;
दीसे क्षणीक सर्व हें, भरवसा घडीचा कसें
धरील मन? आधीनें बहु परीभ्रमें चाकसें.

४१ कृतांत-कटकाऽमल-ध्वज-जरा दीसो लागली;
पुरःसर-गदांसवें झगडता तनू भागली;
सहाय दुसरा नसे तुज़वीण बळें आगळा;
न हो ज़री उतावीळा, स्व-रीपु कापीतो हा गळा.

: ६ :

[ तुम्ही सुखी तर आम्ही सुखी, म्हणून मला तुमचीच आधी काळजी वाटते । ]

४२ अवश्य करणें असें, प्रणत-रक्षण स्वोचीत;
अुशीर मग कां? बसो कृपण मीही कां शोचीत?
नवे प्रभु-वरा! तुम्हा अुचीत अेकटे धावणें;
कृतांत शीवला नसे तंव दीसे बरें पावणें.

४३ ‘कसें तरी करू तुझें अवन; पूरवू आळ, जी
असेल मनीं; आमुची तुज कशास रे! काळजी?’
असें जरी म्हणाल, हो! प्रीयतमा! जगज्जीवना!
तदाश्रीत-मृगासी ती सुख-समृद्धी, बा! जीवना.

४४ सुखेंची सुख बाळका प्रकट होय मातेचीया;
तीला घडती जे श्रम, प्रीय-जनोत्तमा! तेची या;
म्हणोनी न शीवो पळ क्षणही कष्ट जीवा! तुला,
वीपज्-जलधी-सेतुला, सकल-लोक-जीवातुला.

४५ असोत तुज आमुचीं सकल भावीकायुर्-बळें;
जयांनी बहु, काय मग सुकृत जोडीलें दुर्बळें?
असें प्रीय-सखा! सुखी बहुतकाळ; माया-तमीं
जना सुपथ दाअवी; मुदीत, सत्तमा! यात मी!

४६ 'भले परीशीले सुराऽसुर-नरीं तसे लक्ष मी'
'मणोत 'मणणार, बा! तुज़ असा नसेल क्षमी;
अरीं भृगु-पदाहती मीरवीतोसी अद्यापी ती,
कवी तव यशः-कथा नव-सुधाऽनवद्या पीती.

:७:

[माझ्या चीत्तातील वीषय-वासनेचें नीवारण करा, 'मणजे मी तुमच्या गुण-कथेत मग्न राहीन। ]

४७ 'भवन्-मतीस आवडे ज़री, धनादीकालागी ते,
मदीय गुण-कीर्तन-श्रवण कां तरी त्यागीते?'
असेंही 'मणशील बा! ज़री, तरी तुझी मावली
तुज़ त्यजुनी, पाजीता, कशी दुधाकडे धावली?

४८ अनावर पीशाचीका वीषय-वासना सत्य, जी
असे करवी कृत्य, जी भुलवीते, कधी न त्यजी;
'मणोनी तुज़ ज़ाणता वीनवीतो, 'ईला काढ गा!'
करीन मग, तू ज़री 'मणसी, आपणा 'गाढ गा.'

४९ तुझ्या गुण-कथा महा-सुरभी; त्यांत ही रासभी
शीरे वीषय-वासना; ज़शी शुका अहीरास भी,
तशी न ईतरास भी; ईस सदंडही हाकीती,
तथापी वहु लाथली; मग अदंड मी हा कीती?

५० थरास,र ज़सा, तशी वीषय-वासना ह' थरी;
हीच़ा वध करावया, त,ज़ची शक्ती आह' थरी;
बकी स,मती, ताटका लघ,, न ह' भली; लाज़शी
अ,गाची; तशी अ'क ही, व्रज-वनात लीला ज़शी.

५१ कस' तरी असो मग; स्व-पण-रक्षणाकारण'
अवश्य शरणागत-व्यसन तो स्वय' वारण';
त,'मा वीहीत म,ख्य ह'; न प,सता करा, हो थरी
नीजोक्ती; थर काय तो अधीक? स'हरा हो थरी.

५२ थरी करीतस' कशी तव जनींही सत्ता, पहा;
हीच़ा वध न नींद्य, बा! प्रबळ म,र्त सत्ताप हा;
'कथा-स,रभीच़ा रस स्व-हीत, प,ष्कळ, स्वाद,ही,'
'मण','त्यज,नी कां मला नीज-धना, परस्वा, द,ही?'

५३ कथा-स,रभी यां भलत स्व-जननींह,नी वाटती;
शीश,ंसी जरठांसही नीरखीता रस' दाटती;
द,होत भलत' सदा तरी न ल'शही आटती;
स्व-वत्स-मल भक्षीती, परी न सर्वथा बाटती.

: ८ :

[ ध्रुवाप्रमाणे मला तुमचे गुण गाणयाची शक्ती दे । ]

५४ कथांसी उपमा दीली सुरभीची, दीसे नीट ती;
परंतु बहु-मंद मी, 'मणुनी सच्-छुरुती वीटती:
कथा नीरुपमा, तयाप्रती पशूपमा, शुद्ध ते
नवेची; न वीचारीले बुध-जनांसी मी उद्धते.

५५ असेही उपदेशीती गुरु रहस्य मंदा, 'रुचे
नीज-स्तव ज़सा तसा, अगुण घे न वंदारुचे;'
'मणोनी नीगम-स्तुता! भलतसे तुला वानीतो,
परंतु हृदयीं महाजन-भयास मी मानीतो.

५६ 'मणे-'स्व-कृतीचय, उणे कीमपी, अेक वर्णीं, न हो;
असे तुज़ कधी बरे वीगत-शंक वर्णीन हो!'—
असेची अशी आवडी, करीसी कां न अत्यादर?
स्व-भक्त-सुर-पादपा! हरी! नसेची सत्या दर.

५७ ध्रुव स्तवनीं आवडी धरी, 'मणोनी अत्यादरे
तु'मी करुनी दावीली, शीवुनी गल्ल, सत्या, दरे;
तसे मज़ करा, करांबुज धरा शीरीं, मा-वरा!
वराऽभयपरा! पराक्रमपटो! मना आवरा.

५८ करांबुज असो; नसे उचीत तम्स मी पामर;
प्रणाम करीती पदाप्रतीही सन्मुनी साऽमर;
पदाऽब्ज-रजही जगत्-त्रय-नमस्क्रीया-भाजन;
प्रसाद-चतुरा! कसा तरी करा बरा हा जन.

५९ तुम्ही करुनी दावीला ध्रुव कृतार्थ ज़ैसा दरें,
तसेंची ज़री योजीलें तुमचीया मनें सादरें,
असो; वीहीत तें करा; परी बरोबरी तम्सवें
नसे उचीत; तो महा-प्रबळ, वंदीजे वासवें.

६० कीती वय! कसें तप प्रखर! काय वीश्वास तो!
ध्रुव ध्रुव खरा; स्तवा उचीत होय वीश्वास तो;
कशी तुळीतसा तुम्ही प्रकट मेरुशी मोहरी?
प्रसाद करीता उणें अधीक नाठवा, हो! हरी!

६१ प्रभुत्व तरी हेंच की, करुनी दे कृपा दान तें,
स्व-साम्य यदुपारजनें मीरवीजे स्व-पादानतें?
प्रसाद मग काय तो, ज़री नीवारीना लाघवा?
कसें दश-मुखाऽनुजा वीसरला? अहो! राघवा!

६२ असो वरी कसा तरी, वीमल भाव ज्यांचा, करा
तयावरी दया; पुढे वर असाची दे चाकरा;
वृथाची गमते दीले, बहुही; जे न दासा जीरे;
पुसोनी अधीकार दे; सुकर ते सदा साजीरे.

: ९ :

[ माझी कसोटी न पाहता तुमची नेहमीची दया दाखवा । ]

६३ तुझे कुशल नाम बा! हळुहळू मना आकळी,
दुरत्यय असा महा-खळही त्यास भी हा कळी;
हरी व्यसन पाप हे; बहु कशास? कायाधवा-
परी त्वरीत भेटवी तुजही, योगमाया-धवा!

६४ तुम्हासमची हे गुणे; अणु अणुने नसे नाम; हा
दीसे अधीकही तसा गुण, तुला असेना महा;
सदैव भलत्यासही सुलभ; आणखी गायका
छळी न, न अधोगती क्षणही दे, जगन्-नायका!

६५ छळी, नृप बळी बळी, तरीच तो नसे आटला,
गमे बहु भला, मला न, सकळांसही वाटला;
परीक्षक करी तसे जडही सोशीते हे मही;
न केवळ वीरोचनात्मज, तरे पदे हे मही.

६६ नको छळ; अधीर मी; तशी न कीर्ती हो; चामरें
नृपासी उचीतें; वृथा, मीरवीलीं ज़री पामरें;
अकीर्तीच असो, रुचे तुज़ कशी व्रजीं कांबळी!
असें न समजा कसें? वरील हारीला कां बळी?

६७ छळाल कृपणासी कां? अजी दया-नीधे! कापीती
भटासी भट संगरीं, परी न कातरा दापीती;
कराल तीतुकी कृपा बहु; अहो! शरण्या! तुम्ही
बुडोनी, शरणागत श्रमतसे अरण्यात मी.

६८ मुखासी ज़ंव पातलीं 'श्रम', 'अरण्य' ऐशीं पदें,
नीज-स्मृतीस ज़ाहलीं वीषय ती तव श्री-पदें,
गुरूक्तीस करावया सफल, जानकी-जीवना!
धरा-सुर-तपः-फळें त्वरीत धावली जी वना.

६९ तयी प्रभु-वरा! तसे सदय; कां असे आज़ हो?
वीचारुनी पहा बरें नीज-मनीं, महाराज़ हो!
वनोवनीं फीरा पीशापरी, म्हणा अहोरात्र 'हा!'
नसे कुशल भाषणीं, परी असे कृपा-पात्र हा.

७० समागम तुझा घडो, म्हणून ज़ाहले लाकडें
तपोऽनलीं तसे मुनी त्यजुनी, ज़ोडीलीं माकडें,
अयुक्त बहु जे जनास्तव घडे, पडे साकडें,
तदुक्तीहुनी आमुचें बहुत बोलणें वाकडें ?

७१ न ज़ें प्रीय, सदोष तें; प्रीय सदोषही चांगलें;
स्व-तोक पीतरां रुचे, ज़रीही कर्दमीं रांगलें;
तुलाची धरी पोटीशी कशी तदा यशोदा बरें ?
ज़री मळवीशी रजोमलीन-काय तू अंबरें.

७२ तुझे कथीती गोपीका वीवीध तसे बोभाट, ते
सुख-प्रद गुण-स्तवापरीस ज़ाहले वाटते;
क्षमा न करी अेकदा, तरीही फार ओढी करा;
न देची भय, ताडनोद्यमसमेत सोडी करां.

७३ तुम्हीही बळी बांधीला, म्हणुनी आमुची माय जी
मनात सहज़ा दया, नीपट टाकीली काय जी ?
सकोप दीसती गुरू क्षणभरीच; ज़ें तापलें
जल ज्वलन-संगमें, त्यजी न शैत्य तें आपलें.

: १० :

[ तुमची दयाळुपणाला उपमाच नाही । ]

७४ प्रसीद्ध तुमचे महा-सदय पाय; जीवाकडे
चुकी, म्हणुनी होतील क्षणही काय जी वाकडे?
न निष्ठुर पीता; म्हणे मनीं, 'न हो प्रजा टोणपी;'
अपथ्य-रुची-रुग्ण तो कटुक औषधें कोण पी?

७५ असंख्य खळ संगरीं नीज-करीं तुवा मारीले;
न नीष्ठुरपणे, कृपा करुनी ते भवीं तारीले;
जगज्-जनक तू, मुलें सकळ जीव, या भातुकें;
दटावुनीही देशी बा; अमृत नेदीजे घातुकें.

७६ सदाही हीत नायको; बहु अपाय केले, करू;
तरी सकृप बाप तू म्हणसी 'नायके लेंकरू;'
कधी न करीसी प्रभो, भजक-बाळकोपेक्षण;
न तूज़वरी जीपरी पशुप-पाळ कोपे क्षण.

७७ खरा जनक तू, जनां इतर कोण हो देव वी?
समीहीत फळें जगा तव पदाऽब्ज दे, देववी;
अशीच करुणा असो, हरी! कधी न भंगो पीता;
अशा मज़ असाधुला इतर कोण संगोपीता?

७८ सुवीद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी
प्रपंच, भर घे शीरीं, करी कृपा पीता त्यावरी;
असा ज़री नसे, रुचे तरी न तो अभद्र क्षण;
तसा तुज़ची आवडे; करीसी तूची तद्-रक्षण.

७९ पीता ज़री वीटे, वीटो; न जननी कुपुत्रीं वीटे;
दयाऽमृत-रसार्द्र-धी न कुल-कज्जलें तम कीटे;
प्रसाद-पट झाकीती, परी परा गुरूचे थीटे;
'मणूनी 'मणती भले 'न अणु जन्मदेचें फीटे'.

८० वीटेल जननीही कीं शत रची नीमीत्तें वीधी;
मळे कली-युगीं श्रुती ज़शी, अळी तीची तेवी धी
कदाचीत वीटेल, बा! तव दया न दीनावरी;
ज़शी जगदघ-क्षयीं कर भवन्-नदी नावरी.

८१ कृपाची जननी तुझी, सकल जीव दायाद; या
तीणेंची अपदेशीलय करीती सर्व दाया दया;
असें असमज़ता भले न गुरु-भाव तो टाकीती;
मता तुज़ही गोपीका, मग जनास तोटा कीती ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक वि: नों: दि:

८२ भरोनी कुच-कुंभ, जरी वीष-रसें मुखीं दे बकी,
प्रभो! तीसही ठेवीशी, जशी महा-सुखीं देवकी;
न होती जननी कशा पशुप-दार, गाअी? लया
न पावतीच तत्-सुखें, कृती न कोण गाअील या?

८३ अशी तरी कृतज्ञता हरी! तुझ्मची ठायी अगा!
सखा! अणूची मानीशी, करुनी सुप्रसादा अगा!
भुले सुकवी-वाग्-वधू तव गुणा अनर्घ्या नगा;
'मणेल जन कोण, की यश पुनःपु'ना तें न गा?

: ११ :

[तुमच्या मोहक रूपालाही तुमच्या कथेची सर येणार नाही।]

८४ तु'मी बहु भले, मला अुमज होय असें कथा;
कसा रसीक तो? 'पु'ना' जरी 'मणेल 'आली कथा;'
प्रती-क्षण नवीच दे रुची, शुकाही संन्यासीया;
न मोहीती भवत्-कथा अरसीका अधन्यासी या.

८५ कथा भुवन-मोहीनी अशी न मोहीनी होय ती;
हरी असुर-धी; हीणे भुलवील कीती हो! यती,
न'वे न 'मणवे; असो; जरी वीमोहीला दक्षहा,
प्रीया बसवीली शीरीं, मुनी-पथीं कसा दक्ष हा?

८६ सुराऽसुर-नरोरगा भुलवुनि कथा न त्यजि;
न भेद करी पंक्तीचा, अमृत पाजीति सत्य जि;
तीणे ज़री सुधा-रस स्व-रत-मानसा पाजीला,
वधि अमृत घोटीता, द्रव न येची बापा! जीला.

८७ ’मणोनी बहु मोहीनिंहुनी भलि कथा हे तुजि,
अभिष्ट फल दव्वया नत-मनोरथा हेतु जि;
’मणाल ज़री, ‘मिंच तव, वीषम काय दोघिंत! रे?
ज़सा जन सीताऽसीताऽभीध-नदि-सदोघि तरे’.

८८ अहा! बहु वीशुद्ध हे प्रभु! तव स्वरूपाहुनि;
न भीन्न-तनु तव; भले भज़ती, अेकता पाहुनि;
परंतु वदतो जनाऽनुभव, नातळो पाप गा?
तशि न यमुना गमे, ज़शी गमे नीलींपापगा.

८९ जगद्-गुरु-महेश्वर-प्रभु-शीरिं जीचें नांदणें,
जीचव जळ-मळें तुळे न शरदींदुचें चांदणें,
प्रजा हरी-हरा अशा यदुदरिं अनेका; कवि-
मीअूनी ’मणतील का, ‘ज़शी सुधा तशि काकवि’?

९० 'तुला स्व-यमुनेसवें, कुवलय-द्युति-श्यामला !'
'मणाल ज़रि 'मोहिनी निज-तनू' अवश्या मला,
तुलीन अमृतोदधी-प्रभव-पुंडरीकाऽमला
कथा सुर-धुनीसवें, सुजन जींत विश्रामला.

९१ प्रभो ! तुज़ न मोहिनी भुलवि, मोहिला तोहि ती
त्यजी जन; न वें तशी, तुज़ तुझी कथा मोहिती;
निजाऽनुभव तू पहा; ज़शि महौषधी पारदा,
तुला स्थिर बळें करी, कळविलें तुवा नारदा.

९२ सुरर्षिज़वळीं स्वयें वदसि, 'तत्र तिष्ठामि;' या—
तुझ्चि वचनें 'मणें तुज़ 'कथा-वश' स्वामिया !
ज़सा स्थिर कथेंत तू, स्थिर करी तसें या मना;
स्व-भक्त-सुर-पादपा ! सफळ हें असो कामना.

९३ सुरर्षि 'मणतो, 'तुझें यशचि धन्य; यो गायना
मला; कवि 'मणोत तें सुखद अन्य-योगाऽयना;'
विमुक्ति-बहु-साधनें तदितरें गणीनाच़ तो;
सज़ूनि वर-वल्लकी तव सभांगणीं नाच़तो.

९४ तुझें चरीत सन्-मुखें श्रवण ज़ाहलें, यास्तव
प्रजापती-सुतत्व ये, करीती साधु ज्याचा स्तव;
स्वनिश्चयपण मागीलें, बहु दया अशी, नारदा
स्मरे घडीघडी, प्रभो! भव-पयोधीचा पारदा!

: १२ :

[ सत्-संगतीत ठेवून मला मार्गाला लावा, एवढेंच माझें शेवटचें मागणें आहे । ]

९५ तुझें यशची तारीतें, परी न केवळा तारवें ;
सहाय असीला असे, तरीच शत्रुला मारवे ;
न भागवत भेटता, न घडताही सत्-संगती,
न अज्ञ-हृदयें तशीं तव यशो-रसीं रंगती.

९६ बुडे, बुडवी सागरीं तरी, सुकर्ण-धारावीना ;
सहाय नसता स्वयें पर-तटासी ती दावीना;
सहाय भगवज्-जना तव सुकीर्ती जेवा करी,
तशीच उतरी भवोदधी-तटीं जना लौकरी.

९७ सुसंगती सदा घडो ; सुजन-वाक्य कानीं पडो,
कलंक मतीचा झडो ; वीषय सर्वथा नावडो ;
सदंघ्री-कमळीं दडो ; मुरडीता हटानें अडो ;
वीयोग घडता रडो मन, भवच्-चरीत्रीं ज़डो.

९८ न नीश्चय कधी ढळो; कुजन-वीघ्न-बाधा टळो;
न चीत्त भजनीं चळो; मती सदुक्त-मार्गीं वळो;
स्व-तत्व हृदया कळो; दुरभीमान सारा गळो;
पुन्हा न मन हें मळो; दुरीत आत्म-बोधें जळो.

९९ मुखीं हरी! वसो तुझी कुशल-धाम-नामावली,
क्षणात पुरवील जी सकल कामना, मावली;
कृपा करीशी तू जगत्-त्रय-नीवास! दासावरी,
तशी प्रकट हें नीजाश्रीत-जना सदा सावरी.

१०० दयाऽमृत-घना! अहो हरी! वळा मयूराकडे;
रडे शीशु, तयासी घे कळवळोनी माता कडे;
असा अतीथी धार्मीक-स्तुत-पदा! कदा सापडे?
तुम्हां जड भवाऽर्णवीं उतरीता न दासां पडे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 2८११० वि: काव्य
क्रमांक १५०४ नों: दि: १२।१२।६

# केका-सूची

## अंक केकांचे आहेत।


| | | | |
|---|---|---|---|
| अगा! प्‌रणत-वत्‌सला! | ७ | कराल पुरतै दया, | १२ |
| अतर्‌क्‌य महीमा | २३ | कवैश्‌वर-मनः- | २८ |
| अनावर पीशाचीका | ४८ | कसे तरी असो | ५१ |
| अवश्‌य करणे खरे, | ४२ | कसे तरी करू | ४३ |
| अशै तरी कृतज्ञता | ८३ | कळै करी सुनीर्‌मळैं | १८ |
| असंख्‌य खळ संगरैं | ७५ | कीतै वय! कसे तप | ६० |
| असे न 'मणशैल | ११ | कीतै श्‌रवण झाकीतै | २६ |
| असेही अपदेशीतै | ५५ | कृतांत-कटकाऽमल- | ४१ |
| असोत तुज़ आमुचैं | ४५ | कृपाची जननै तुझै, | ८१ |
| असो वरी कसा तरै, | ६२ | खरा जनक तू, | ७७ |
| अहा! नीपट धृष्‌ट मै; | १४ | खरासुर ज़सा, | ५० |
| अहा! बहु वीशुद्‌ध | ८८ | खरै करीतसे कशै | ५२ |
| कथा भुवन-मोहीनै | ८५ | गमो मधुर, हे वीष- | २७ |
| कथांसी अुपमा दीलै | ५४ | चीकीत्‌सक 'भला भला' | ३९ |
| कथा-सुरभी या भलै | ५३ | छळाल कृपणासी कां? | ६७ |
| करांबुज असो; नसे | ५८ | छळैं, नृप बळै बळै, | ६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| जगद्-गुरु-महेश्वर- | ८९ | दीले, फीरुनी घेतले, | १३ |
| जनीं तरी असे असे, | २२ | धना, परीजना, घरीं | २० |
| ज़शी पृथुक-तंदुल- | ३३ | ध्रुव स्तवनीं आवडी | ५७ |
| जीणे, रस पहावया, | ३४ | नको छळ; अधीर मी; | ६६ |
| तयीं प्रभु-वरा! तसे | ६९ | न ज़े प्रीय, सदोष | ७१ |
| तरेन तुमची बळें | १९ | नताऽवन-धृत-व्रत! | ६ |
| तसाची अुरलो कसा ? | ४ | न नीश्चय कधी ढळो; | ९८ |
| तुझी गुण-कथा | ४९ | नवे अनंत, सत्य ते; | ३८ |
| तुझी, जीरवीले बहु | १६ | नीज-स्तुती तुम्हा रुचे; | २४ |
| तुझी, बहुत शोधीले | ३ | पटुत्व सकलेंद्रीयीं, | १० |
| तुझे कथीती गोपीका | ७२ | पदाऽब्ज रज ज़े तुझे, | २ |
| तुझे कुशल नाम बा! | ६३ | पीता अळ, परंतु ती | ३१ |
| तुझे चरीत सन्-मुखे | ९४ | पीता ज़री वीटे, | ७९ |
| तुझे यशची तारीते, | ९५ | प्रभुत्व तरी हेच की, | ६१ |
| तुम्हासमची हे गुणे; | ६४ | प्रभु-स्तुती न ठाअुकी, | २१ |
| तुम्ही करुनी दावीला | ५९ | प्रभो! तुज़ न मोहीनी | ९१ |
| तुम्ही परम चांगले, | २५ | प्रभो! शरण आलीयावरी | ३५ |
| तुम्ही बहु भले, | ८४ | प्रसीद्ध तुमचे महा- | ७४ |
| तुम्हीही बळी बांधीला, | ७३ | बुडे, बुडवी सागरीं | ९६ |
| तुला स्व-यमुनेसवे, | ९० | भरोनी कुच-कुंभ, | ८२ |
| दयाऽब्द! वळशील तू, | १७ | भले परीशीले सुराऽसुर- | ४६ |
| दयाऽमृत-घना! अहो | १०० | भले स्मरण ज़ाहले | ३२ |

भवन्-मतीस आवडे ४७
मला नीरखीता, भवच्चरण ८
मुखासी ज़ंव पातलें ६८
मुखें हरी ! वसो तुझे ९९
'मणा मज़ अुतावीळा; ४०
'मणे—सेवकुतीचम, अुणे ५६
'मणोनी कवीता-सुता २९
'मणोनी बहु मोहीनींहुनी ८७
वीटेल जननींही करी ८०
वीपाक न गणोनी, मज ३७
व्रजाऽवन करावया ५
शीवे न तुझीया पदा ३६
सदाशुरीत-पदा ! १
सदाही हीत नायको; ७६
सदैव अपराध हे १५
सदैव नमीता, ज़री ९
समागम तुझा घडो, ७०
सुखेंची सुख बाळका ४४
सुरर्षीज़वळीं स्वयें ९२
सुरर्षी 'मणती, तुझें ९३
सुराऽसुर-नरोरगा ८६
सुवीद्य, धन मेळवी, ७८
सुसंगती सदा घडो; ९७
स्मरोनी कुत-मंतुला, ३०



REFBK-0008363
REFBK-0008363
मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 28990 वि: काव्य
क्रमांक 9508 नों: दि: 121214